# असाही एक त्रिकोण !

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**असाही एक त्रिकोण ! : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ १९०/-

# असाही एक त्रिकोण !

# १

वरच्या स्टेशनावरून गाडी सुटल्याची वर्दी देणारी घंटा वाजली होती, त्याला बराच वेळ होऊन गेला होता. आता लवकरच कल्याणपूर स्टेशनावर गाडी येणार होती. आपआपल्या माणसांना उतरवून घेण्यासाठी आलेली वीस पंचवीस माणसं प्लॅटफॉर्मवर इथे तिथे उभी होती...कल्याणपूर संस्थानचे कुणी बडे पाहुणे या गाडीनं येणार असावेत, त्यांच्या स्वागताची तयारी चालली होती. स्टेशनाच्या इमारतीतल्या एका प्रशस्त खोलीचा जाणाऱ्या येणाऱ्या बड्या पाहुण्यांसाठी प्रतीक्षागृह म्हणून उपयोग केला जात असे...एरव्ही ही खोली बंद असे. पण कुणी पाहुणे यायचे असले किंवा जायचे असले की हे प्रतीक्षागृह उघडलं जात असे. झाडून झटकून सुसज्ज करण्यात येत असे. विशेष बडे पाहुणे असले तर प्रतीक्षागृहाच्या वाटेवर लाल कार्पेट अंथरली जात असे...आज ती तशी अंथरलेली दिसत होती. ती पाहून लोक समजत होते की आज येणारे पाहुणे विशेष बडे असले पाहिजेत...फलाटावर रेंगाळणाऱ्या लोकांपैकी काहींना कोण पाहुणे येणार ते माहीत होतं. काल त्यांनी वृत्तपत्रात वाचलं होतं की कल्याणपूर संस्थानाचा कारभार पाहण्यासाठी सर्वाधिकारी म्हणून ज्यांची नेमणूक सरकारनं जाहीर केली होती ते वैजनाथ पंडित आज कल्याणपूरला येऊन दाखल होणार होते व संस्थानाच्या कारभाराची सूत्रं हाती घेणार होते...स्टेशनातील प्रतीक्षागृहापुढे जी धांदल गडबड चालली होती तिच्याकडे बघून 'कोण येणार आहे हो?' म्हणून विचारणाऱ्या लोकांना ही माहीतगार माणसं सांगत होती, 'अहो, कोण म्हणून काय विचारता? आपल्या संस्थानचे नवे कारभारी येताहेत आजच्या गाडीनं.'

कल्याणपूर संस्थानच्या माजी अधिपतीना मूलबाळ झालं नव्हतं. त्यांनी सरकारच्या संमतीनं एका मुलाला दत्तक घेतलं होतं; परंतु ते वारले तेव्हा तो मुलगा अवघा बारा वर्षांचा होता. तो वयात येईपर्यंत संस्थानाच्या कारभाराची काही तरी व्यवस्था करायला हवी होती. दिवंगत झालेल्या महाराजांच्या कारकीर्दीत संस्थानी कारभाराचा फार दुर्लौकिक झाला होता. अनेक घोटाळे निर्माण झाले होते. रेसिडेन्ट आणि महाराज यांच्यात अनेक बाबतीत मतभेद आणि कटकटी उत्पन्न झाल्या होत्या. महाराजांच्या निधनाचा फायदा घेऊन सरकारनं ठरविलं होतं की वर्षानुवर्ष चालत आलेला गोंधळ दुरूस्त करून कल्याणपूर संस्थानाच्या कारभाराला चांगलं वळण लावून देण्याचं काम आता करायचं...यासाठी निवृत्त झालेले महसूल-कमिशनर वैजनाथ यांना सरकारनं विचारलं होतं की कल्याणपूरचे सर्वाधिकारी म्हणून तुमची नियुक्ती केली तर तुम्ही जाल काय? वैजनाथनी रुकार दिला होता...आज ते कल्याणपूरला येत होते...

फलाटावर बंदोबस्त राखण्यासाठी तीन चार पोलीस उभे होते. स्टेशनाबाहेरच्या आवारातही पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था होती. प्रतीक्षागृह सुसज्ज करण्यासाठी, लाल कार्पेट अंथरण्यासाठी धावपळ करणाऱ्या कामगारांवर देखरेख करण्याकरिता महाराणी साहेबांचे खाजगी कारभारी काकासाहेब शिरगोपीकर केव्हाच आले होते...गाडीची वेळ होत आली तेव्हा वैजनाथ याना उतरवून घेण्यासाठी व त्यांचं स्वागत करण्यासाठी संस्थानाचे बडे बडे अधिकारी येऊ लागले. माजी दिवाण आले, कलेक्टर आले, चीफ जस्टिस आले, महसूलमंत्री, शिक्षणमंत्री, अशी मंडळी आली. चीफ पोलीस ऑफिसरही आले.

गाडी आली आणि थांबली.

ज्या डब्यात वैजनाथ दिसले त्या डब्याच्या दारापाशी सारी बडी बडी माणसं उभी राहिली...वैजनाथ आणि त्यांची सोळा वर्षांची कन्या शकुंतला यांना उतरवून घेण्यात आलं, आणि लाल कार्पेटवरून प्रतीक्षागृहात नेण्यात आलं. वैजनाथ आणि शकुंतला यांना हार घालण्यात आले. पुष्पगुच्छ देण्यात आले. सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वैजनाथ यांना परिचय करून देण्यात आला. चहापाण्याचा कार्यक्रम झाला, हवा-पाण्याच्या मामुली गप्पा झाल्या, कलेक्टरसाहेब उभे राहिले. त्यांनी घसा साफ केला. त्यावरून भाषण करण्याचा त्यांचा विचार दिसला. परमपूज्य



महाराणीसाहेब, संस्थानाचा सर्व अधिकारी वर्ग आणि संस्थानाची प्रजा यांच्यातर्फे मी वैजनाथ यांचं स्वागत करतो. साहेबांची कारकीर्द यशस्वी होईल, संस्थानाची भरभराट साधणारी होईल, प्रजेचं सुख वाढविणारी होईल याविषयी आम्हा सर्वांना खात्री वाटते. एवढी दोन-तीन वाक्यं ते इंग्रजीत बोलले, आणि खाली बसले. कल्याणपूरला 'कल्याण' नावाचं एक वृत्तपत्र होतं त्या दैनिकाचे संपादक उद्धवराव पाटील उभे राहिले, आणि त्यांनी मात्र चांगलं दहा मिनिटांचं भाषण केलं. संस्थानाची सारी प्रजा वैजनाथ यांच्या कारभाराकडे फार मोठ्या आशेनं पाहात आहे, असं ते म्हणाले...वैजनाथ उभे राहिले, आणि तोंडावर हास्य आणून ते म्हणाले, ''भाषण करण्याची कला मला फारशी अवगत नाही; परंतु माझ्याविषयी ज्या भावना आपण व्यक्त केल्यात त्यांना उत्तर दिलं पाहिजे. एवढंच म्हणतो की, आपण केलेल्या स्वागताबद्दल मी आपला आभारी आहे, आणि जनतेच्या हितासाठी संस्थानाचा कारभार माझ्या अल्पमतीप्रमाणे आणि अल्प शक्तीप्रमाणे मी करीन...' माजी दिवाणसाहेब, चीफ जस्टिससाहेब, कलेक्टरसाहेब यांच्याकडे बघत ते म्हणाले, 'माझ्या कामात आपलं सर्वांचं सहकार्य मिळेल तर माझी कारकीर्द यशस्वी होईल ...' एवढंच बोलून खाली बसण्याचा त्यांचा विचार असावा...परंतु तो बदलून ते म्हणाले, 'आपल्यापैकी फार थोड्या लोकांना माहीत असेल अशी गोष्ट सांगावीशी वाटते. माझं शिक्षण इथेच झालेलं आहे. माझ्या विद्यार्थीदशेतली सहा वर्ष मी कल्याणपूरमध्ये काढलेली आहेत. तेव्हा मी काही कुणी परका नाही; आपल्यातलाच आहे...' मग ते खाली बसले.

उद्धवराव पाटील यांच्यातला संपादक जागा झाला...त्यांनी मनाशी ठरविलं की, 'कल्याण'च्या उद्याच्या अंकात वैजनाथ यांच्या आगमनाची आणि स्वागताची बातमी देताना ठळक टाइपात चार कॉलमी मथळा टाकायचा.

'वैजनाथ म्हणतात की मी कुणी परका नाही, तुमच्यातलाच आहे!'

००० 

वैजनाथ आणि त्यांची सोळा वर्षांची मुलगी शकुंतला दोघंच आलेली पाहून काही लोकांना आश्चर्य वाटलं. साहेबांच्याबरोबर त्यांच्या पत्नी का आल्या नाहीत असा प्रश्न साहजिकच लोकांच्या मनात आला. परंतु काकासाहेब शिरगोपीकर यांना व इतर काही मोजक्या माणसांना आधीच माहीत झालेलं होतं की साहेबांबरोबर

त्यांच्या पत्नी येणार नव्हत्याच. साहेबांनी पत्नीपासून घटस्फोट घेतला होता. आता ते आणि त्यांची मुलगी शकुंतला एवढंच त्यांचं कुटुंब होतं. मात्र महाराणीसाहेबांना ही गोष्ट काकासाहेबांनी सांगितली होती, आणि विचारलं होतं, 'सर साहेबांसाठी मोठा बंगला ठेवायचा की लहान बंगला?' तेव्हा त्या म्हणाल्या होत्या, 'साहेब आणि त्यांची कन्या दोघंच येणार असली तरी मोठ्यातला मोठाच बंगला त्यांच्यासाठी सुसज्ज ठेवा. साहेब संस्थानाचे सर्वाधिकारी कारभारी म्हणून येत आहेत. त्यांच्या दर्जाला शोभेल अशीच त्यांची सारी व्यवस्था ठेवायला हवी. त्यांच्या तैनातीला गाडी द्यायची तीदेखील उत्तमातली उत्तम असायला हवी. गाडीवर ड्रायव्हर नेमाल तोदेखील चांगला असायला हवा. आदबशीर वागणारा, नीटनेटका राहणारा, अबोल, आज्ञाधारक.'

महाराणीसाहेबांच्या या आज्ञेप्रमाणे काकासाहेबांनी सारी व्यवस्था चोख ठेवली होती.

माजी न्यायाधीश, कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांनी साहेबांचा निरोप घेतला. संस्थानच्या कारभाराच्या सर्व प्रमुख शाखांच्या अधिकाऱ्यांची सभा आज तिसऱ्या प्रहरी ४ वाजता नियोजित केलेली होती. 'सभेच्या वेळेस आपली भेट पुन्हा होईलच' असं म्हणून साहेबांनी त्या मंडळींना निरोप दिला. खाजगी कारभारी काकासाहेब तेवढे साहेबांना बंगल्यावर पोहोचविण्यासाठी त्यांच्याबरोबर निघाले. साहेबांसाठी राखून ठेवलेल्या बंगल्याच्या दिशेनं गाडी धावू लागली...जिच्यावर संस्थानाचं निशाण आहे अशी गाडी दिसली की वाटेतून दूर सरकायचं, उभं रहायचं, आणि खाली जमिनीपर्यंत वाकून संस्थानी थाटाचा मुजरा करायचा; गाडीत कुणी असो नसो, रिकाम्या गाडीलादेखील 'ताजीम' द्यायची, अशी प्रजेला वर्षानुवर्षांची सवय झालेली होती. तिला अनुसरून लोक उभे रहात होते, बाजूला होत होते, मुजरा करीत होते...शकुंतलेला या प्रकाराची मौज वाटली. ती काही बोलली नाही; परंतु तिनं बापाकडे बघितलं आणि 'गंमतच आहे' अशा अर्थाचं हास्य केलं...शहर वस्तीचा भाग मागं पडला. उत्तरेकडे जाणाऱ्या रुंद हमरस्त्यानं गाडी जाऊ लागली. रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष होते. त्यांच्या शाखांनी कमान केली होती. वृक्षांपलीकडे उसाचे मळे होते. नव्या जातीच्या उसांना शेंड्यावर किंचित गुलाबी छटेचे मोठाले तुरे येतात. या तुऱ्यांची गर्दी उन्हात चमकत होती...असं दृश्य शकुंतेलनं पूर्वी कधी पाहिलं



नव्हतं...बापाकडे वळून ती म्हणाली, 'किती सुंदर...' साहेब तिला म्हणाले, 'कल्याणपूर तुला आवडेल असं म्हटलं नव्हतं का मी तुला?...' काही वेळ ते स्तब्ध राहिले, आणि मग म्हणाले, 'मी पूर्वी कल्याणपूरला होतो तेव्हा किती छोटं होतं हे शहर. आता किती विस्तार झाला आहे त्याचा. उसाचे मळे तर खूपच वाढले आहेत'...पुढच्या बाजूला ड्रायव्हरच्या शेजारी बसलेले काकासाहेब म्हणाले, 'साखरेचा कारखाना इथे निघाल्यापासून जो उठतो तो उसाची लागवड करतो आहे. ज्वारी-बाजरीची पिकं काढायला नकोशी झाली आहेत शेतकऱ्यांना...' साहेब म्हणाले, 'असं चालायचंच. एक नवी चांगली गोष्ट आली की एक चांगली जुनी गोष्ट नाहीशी होते...'

साहेब आणि काकासाहेब यांच्यातील या संभाषणाकडे शकुंतलेचं लक्ष नव्हतं. उंच वाढलेल्या उसांच्या शेंड्यावरचे गुलाबी छटेचे उन्हात चमकणारे तुरे वाऱ्यानं हालले की पाण्याची लाटच वर खाली झाल्याचा भास होत होता. त्या दृश्याकडे पाहण्याचा आनंद ती घेत होती. वृक्षशाखांच्या कमानीखालून जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाढलेल्या उसाच्या मळ्यांच्या सौंदर्यानं तिला मोह घातला होता, आणि ते सौंदर्य किती पाहू असं तिला झालं होतं...

बंगल्याच्या आवारात गाडीनं प्रवेश केला. बंगल्याच्या पोर्चमध्ये गाडी उभी राहिली...ड्रायव्हर उतरला. काकासाहेबही उतरले. दोघांनी दोहोकडची दारं उघडली. साहेब आणि शकुंतला उतरली. काकासाहेबांनी त्या दोघांनाही मोठ्या आदबीनं पायऱ्यांवरून व्हरांड्यातून आत नेलं. ते साहेबांना म्हणाले, 'उत्तमातला उत्तम बंगला आपल्या निवासासाठी निवडला आहे. सहा बेडरूम्स आहेत, मोठी प्रशस्त डायनिंग रूम आहे, हॉल आहे, लायब्ररी आहे. आपल्याला निवासस्थान आवडेल अशी आशा आहे.'

साहेब म्हणाले, 'आम्ही तर दोघंच आहोत. इतका मोठा बंगला कशाला हवा होता आम्हाला? लहान बंगला चालला असता.'

काकासाहेब म्हणाले, 'असं कसं? आपल्या दर्जाला शोभेल असाच बंगला आपल्याला द्यायला हवा.'

साहेबांची राहणी इंग्रजी पद्धतीची आहेस, हे आधी कळलेलं असल्यामुळे महाराणीसाहेबांच्या आज्ञेवरून काकासाहेबांनी खानसामा, बटलर इत्यादींची नेमणूक

करून ठेवली होती...वैजनाथ आणि शकुंतला यांना काकासाहेब म्हणाले, 'आपण कपडे बदलावे, वॉश घ्यावा, वाटल्यास स्नान करावं. ब्रेकफास्ट तयार आहे. आपली जी व्यवस्था ठेवली आहे तिच्यात काही बदल हवा असेल तर मला हुकूम करावा...आता आपली रजा घेऊ का मी?'

साहेब म्हणाले, 'आमची रजा घेता येणार नाही तुम्हाला. आमच्याबरोबर ब्रेकफास्ट घ्या. थोड्या गप्पा मारू. मग जा.'

काकासाहेब अजीजीच्या स्वरात म्हणाले, 'आज माझा शनिवार आहे.'

साहेब म्हणाले, 'तुमचा शनिवार? शनिवार तर सगळ्यांचाच आहे.'

शकुंतला हसली.

साहेबांचा विनोद तर काकासाहेबांना आवडलाच; पण त्यांना अधिक आनंद झाला तो या विचारानं की साहेबांना विनोदबुद्धी होती...मुंबई सरकारचे सर्वोत्कृष्ट महसूल-कमिशनर म्हणून ज्यांनी लौकिक मिळविला होता ते वैजनाथ पंडित कल्याणपूर संस्थानचे सर्वाधिकारी कारभारी म्हणून येत आहेत ही गोष्ट समजली तेव्हा काकसाहेबांनी अपेक्षा केली होती की हे साहेब उंच, धिप्पाड शरीराचे आणि उग्र चेहऱ्याचे असतील; पण त्यांचा हा अदमास खोटा ठरला होता. प्रत्यक्षात वैजनाथ सडपातळ शरीराचे आणि मध्यम उंचीचे असल्याचं त्यांना आढळून आलं होतं. त्यांची चर्याही उग्र नव्हती. मृदू होती. आगगाडीच्या डब्यातून खाली उतरणाऱ्या वैजनाथना काकासाहेबांनी बघितलं तेव्हा त्यांना आश्चर्याचा गोड धक्काच बसला होता...आता तसाच दुसरा गोड धक्का त्यांना बसत होता. साहेबांना विनोदाची आवड होती!

ते साहेबांना म्हणाले, 'माझा शनिवार आहे असं मी म्हटलं ते एवढ्याच अर्थानं की शनिवारी मी उपास करीत असतो. आमच्या कल्याणपूरला शनिवारी उपास करण्याची लोकांची रीत आहे.'

वैजनाथ म्हणाले, 'ती रीत माहीत आहे मला. इथे कल्याणपूरला सहा वर्ष घालविली आहेत मी; परंतु शनिवार असला तरी ब्रेकफास्टच्या वेळेस आमच्या पंक्तीला बसायला काय हरकत आहे? फळं खा. दूध घ्या!'

शकुंतला म्हणाली, 'मी सांगू का बटलरला काकासाहेबांना काय द्यायचं ते?'



ती जाऊ लागली तेव्हा काकासाहेब घाईनं म्हणाले, 'नको नको; आपण कशाला घेता तसदी? मी सांगतो बटलरला.'

ज्या जागी नाश्ता घेत शकुंतला, वैजनाथ आणि काकासाहेब बसले होते ती 'डायनिंग रूम' नव्हती. पूर्वेकडील व्हरांड्यात ब्रेकफास्टची व्यवस्था केली होती. जागा जेवणघरासारखी वाटावी म्हणून सजविली होती. या ठिकाणी बसलं की बंगल्याच्या प्रशस्त बागेकडे पलीकडून जाणारा रस्ता दिसत होता. शकुंतलेनं बघितलं तो दोन उंट त्या रस्त्यानं जाताना तिला दिसले. आश्चर्याच्या आणि आनंदाच्या स्वरात ती बापाला म्हणाली, 'पपा, बघा बघा तरी. उंटांची वर्णनं मी वाचली आहेत; पण प्रत्यक्ष उंट आजच पहात आहे...' तिनं काकासाहेबांना विचारलं, 'इथे उंट आहेत?'

काकासाहेब म्हणाले, 'हा उंटांचा प्रदेश नाही; पण महाराजांनी गंमतीखातर पाच पैदा केले आहेत. त्यांची देखभाल करणारी माणसं मुद्दाम आणविली त्यांनी. आपल्याकडे हत्तीदेखील आहेत.'

शकुंतला म्हणाली, 'होय? मला बघायला मिळतील?'

'का नाही मिळणार? जुन्या राजवाड्यातल्या नगारखान्याच्या भव्य कमानीच्या दोन्ही बाजूंना ते बांधलेले असतात. हत्तीचं नाव आहे शंकर आणि हत्तिणीचं नाव आहे पार्वती. हत्तीवर बसण्याची आपली इच्छा असेल तर बसतादेखील येईल.'

शकुंतलेनं विचारलं, 'आणि उंटावर?'

काकासाहेब म्हणाले, 'होऽ! उंटावरदेखील बसता येईल.'

शकुंतला म्हणाली, 'मी उंटावर बसले की लोक मला म्हणतील उंटावरची शहाणी!'

काकासाहेब मनापासून हसले...साहेबांची ही मुलगी प्रथमदर्शनीच त्यांना आवडली होती...आता तिचं चतुर विनोदी बोलणं ऐकून ती त्यांना अधिकच आवडू लागली.

बापाकडे वळून शकुंतलेनं विचारलं, 'पपा, उंटावरचा शहाणा ही म्हण कशी पडली?'

वैजनाथ म्हणाले, 'या म्हणीची उपपत्ती ज्याला माहीत आहे अशा एखाद्या शहाण्याला गाठून विचारायला हवं.'